# वसंतराव नाईक कृषिभूषण - २०१०



## श्री. बाळकृष्ण (संतोष) गणेश गाडगीळ

मु. पो. वेतोरे (पालकरवाडी),
ता. वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग

- पडीक जमीन व डोंगराळ जमिनीत राबवून मिश्र शेतीवर भर
- भातशेती, फलोद्यान प्रक्रिया उद्योग, दुग्धव्यवसाय, वनशेती व वनऔषधीची मोठया प्रमाणावर केलेल्या लागवडीचा प्रयोग लोकप्रिय.
- त्यांनी कोकम व रिठा या औषधी वनस्पतींची लागवड व्यावसायिकदृष्टया केलेली आहे.
- रूट सकर पद्धतीने कोकमची 'हर्षदा' या नावाने जात विकसित केली आहे .
- तसेच सेंद्रिय शेतीचे प्रचारक म्हणून पंचक्रोशीत ते काम करतात . .

# वसंतराव नाईक कृषिभूषण - २०१०



## डॉ. हेमचंद्र दगाजी पाटील

मु. पो. पंचक, ता. चोपडा, जि. जळगाव.

- शेतीपासून मिळणारे निव्वळ उत्पन्न रू. १० लाख प्रती वर्षे आणि पूरक व्यवसायातून रू. २.५० लाख प्रती वर्षे असे एकूण सरासरी रू. १२.५० लाख उत्पन्न.
- विहिर पुर्नभरण, बांधबंदिस्ती, शेततळे, वृक्ष लागवड यातून जमिनीचा विकास.
- संपुर्ण क्षेत्र बागायती असून यामध्ये ठिबक सिंचन पद्धतीचा वापर.
- शेती व्यवसायासोबत दुग्ध व्यवसाय, गांडुळ खत निर्मिती, व्हर्मीवॉश, सेंद्रिय खत प्रकल्प, इ. पूरक व्यवसाय.

# वसंतराव नाईक कृषिभूषण - २०१०



**श्री. देविदास रामदास मोरे**
धनलक्ष्मी, मु. पो. बावी,
ता. माढा, जि. सोलापूर

- सन १९८४ साली बावी या आपल्या गावी प्रथम द्राक्ष लागवड करून विक्रमी उत्पन्न.
- सिमेंट कॉंक्रीटचा वॉटर टँक बांधून दुष्काळी स्थितीतही द्राक्ष, कलिंगड, आवळा व डाळींब बागा जोपासून विक्रमी उत्पन्न मिळविले.
- त्यांनी १ कोटी लिटर क्षमतेचे शेततळे तयार करून त्यात मत्स्यव्यवसाय सुरू केला आहे.
- कृषि मालावर आधारीत प्रक्रिया उद्योग सुरू केला आहे.

# वसंतराव नाईक कृषिभूषण - २०१०



**श्री. राजेंद्र झुंबरलाल कुंकूलोळ**
मु. पो. कोल्हार, ता. राहाता, जि. अहमदनगर

- एकूण जमीनधारणा ११ एकर आहे. त्यापैकी ८ एकर क्षेत्रावर द्राक्ष फळपिकाची लागवड करून मृद व जलसंधारणाचे उपक्रम.
- सन २००५ पासून त्यांनी रासायनिक खताचा वापर बंद केला आहे.
- एकात्मिक पीक संरक्षण कार्यक्रमाचा अवलंब ते करतात.
- सात्विक सेंद्रिय शेती, संगीत थेरपी, रेकी थेरपी आणि धूप थेरपी इ. तंत्र विकसित करून त्याचा यशस्वीपणे वापर स्वतःच्या शेतामध्ये केला आहे.
- 'सेव्ह द मदर अर्थ' या विषयावर ते प्रबोधन करतात.

# वसंतराव नाईक कृषिभूषण - २०१०



## श्री. शंकरराव दिनकरराव खोत

मु. वाजेवाडी, पो. शिरगाव,
ता. कराड, जि. सातारा

- त्यांच्या शेतीचे वैशिष्टे म्हणजे एकाच मुख्य पीकात १० ते १२ पीके रिले पध्दतीने आंतरपीके, मिश्रपीके पद्धतीने घेतात.
- गांडूळ खत, सेंद्रिय खत, कंपोस्ट खत, जागेवर पाचट कुजविणे, हिरवळीच्या खतांचा वापर, तसेच सेंद्रिय खतांचा वापर करतात.
- सर्व पिकांना सिंचनासाठी ठिबक, तुषार, मायक्रो स्प्रिंकलर, रेनगन इ. प्रणालींचा वापर.
- राज्यस्तरावर राज्य पिक स्पर्धांमध्ये द्वितीय क्रमांक पटकाविला आहे.

# वसंतराव नाईक कृषिभूषण - २०१०



**श्री. जगदीश शामराव पाटील**
मु. पो. कामेरी, ता. वाळवा, जि. सांगली

- संपूर्ण ३० एकर हे ऊस क्षेत्र ठिबक सिंचन व ऍटोमायझर पद्धतीने वापरात आणली आहे.
- सध्या १०० ते १२० टन प्रती एकरी उत्पादन आहे.
- त्यांच्या गावातील २०० एकर क्षेत्र ठिबक सिंचनाखाली आणले आहे.
- ठिबक सिंचनाद्वारे विद्राव्य खते व सुक्ष्म मुलद्रव्याचा वापरतात.
- ऊस पिकाबाबतचे त्याचे केलेले काम उल्लेखनिय असून ते सर्वांना मार्गदर्शक आहे.

# वसंतराव नाईक कृषिभूषण - २०१०



## श्री. नाथराव निवृत्तीराव कराड

मु. पो. इंजेगाव, ता. परळी (वै.), जि. बीड

- समूह शेती हा संकल्प मनात धरून ती कृतीत आणण्यासाठी त्यांनी ४०० ते ५०० शेतकऱ्यांचा गट तयार केलेला आहे.
- ठिबक, कृषि यांत्रिकीकरण इ. चा वापर करून शेती हा व्यवसाय अधिक प्रगतशिल करता येईल याबाबत मार्गदर्शन.
- त्यांनी साई कृषि मंच शेतकरी मंडळ स्थापन केले असून त्यांचे गट शेतीतील इंजेगाव मॉडेल प्रसिद्ध आहे.

# वसंतराव नाईक कृषिभूषण - २०१०



## श्री. मधुकरराव नामदेवराव घुगे

मु. पो. केह्राळ, ता. जिंतूर, जि. परभणी

- झाडातील व ओळीतील अंतर ही पायाभूत संकल्पना विकसित करून भुईमुग उत्पादनाचा उच्चांक.
- ग्राम बीजोत्पादन कार्यक्रम राबवित शेतकऱ्यांना बियाणे पुरवठा.
- पूरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय, गांडूळ खत उत्पादन, निंबोळी अर्क उत्पादन व विक्री.
- भाभा अनुसंशोधन केंद्र, ट्रॉम्बे यांच्यासाठी बिजोत्पादन कार्यक्रम.

# वसंतराव नाईक कृषिभूषण - २०१०



**श्री. प्रदिप रामरावजी जगताप**

मु. पो. जळका (जगताप),
ता. चांदुर रेल्वे, जि. अमरावती

- संत्र्याच्या झाडांना फळधारणा झाल्यावर बांबू न बांधता तारांनी झाडे बांधण्याचे तंत्र त्यांनी अवगत केलेले आहे.
- गावामध्ये आत्मा योजनेचे माध्यमातून लोकसहभागातून शेती विषयक वाचनालय त्यांनी उघडले आहे.
- गावामध्ये सेवा सहकारी सोसायटी मार्फत २३ बचत गटांची स्थापना.
- तालुका स्तरावर संत्रा गटाची स्थापना, प्रक्रिया व निर्यात, याबाबत प्रयत्न.
- उच्च तंत्रज्ञानावर आधारीत सेंद्रिय शेती प्रकल्प.

# वसंतराव नाईक कृषिभूषण - २०१०



**श्री. हेमंत वसंतराव शेंदरे**

मु. पो. सावरगाव, ता. चिमूर, जि. चंद्रपूर

- जमिनीची आरोग्य तपासणी करूनच पिक नियोजन व खतांचा वापर.
- सन २००५ मध्ये वसंतराव नाईक कृषि विज्ञान व बहुउद्देशीय मंडळ, सावरगाव या संस्थेची स्थापना.
- या संस्थेकडे बाजार माहिती केंद्र असून संस्थेमार्फत शिवार फेरी, शेतीशाळा, वनराई बंधारे, कृत्रिम रेतन, शेतकरी सहलीचे आयोजन.
- भातावर प्रक्रिया करून उच्च प्रतीचा तांदूळ 'मंगलकलश ब्रँड' या नावाने विक्री.

# वसंतराव नाईक कृषिभूषण - २०१०



## श्री. गणेश विठोबाजी कुहीटे

मु. पो. उपरवाही,
ता. कळमेश्वर, जि. नागपूर

- त्यांचेकडे 3.६५ हे. जमीन आहे. संत्रा पिकाचे दर्जेदार उत्पन्न घेतात.
- संकरीत ज्वारी, संकरीत कापूस, सोयाबीनचा यशस्वी बिजोत्पादन .
- पूरक व्यवसाय म्हणून जय भवानी मिनी दाल मिलची उभारणी
- ग्रामीण गोदाम योजनेतून ७००० वर्गफुटाचे गोडाऊन उभारले
- कमी खर्चात वेळेवर कापणी व मळणी होण्याकरीता त्यांनी सामुहिक हार्वेस्टर घेतला .